महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , पुणे**
**email @ preserviceedudept@maa.ac.in**

जा.क्र.राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण (SBTE)/२०२६ दिनांक : ११ .०६.२०२६

प्रति,

-----------------------------
-------------------------------

**विषय:** व्हिडीओ निर्मिती करणेसाठी दर पत्रक सादर करणेबाबत.
संदर्भ: कार्यालयाची मान्य टिपणी दि. २ मार्च २०२६

उपरोक्त विषयाबाबत, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे ( सेवा पूर्व विभाग ) या कार्यालयाकडून TET परीक्षा मार्गदर्शक व्हिडीओ निर्मिती करण्यासाठी, अशा प्रकारच्या व्हिडीओंची निर्मिती करणाऱ्या संस्थांकडून खालील नमुन्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील / स्वरूप | संभाव्य व्हिडीओ संख्या | प्रती व्हिडीओ दर | | एकूण संभाव्य संख्येनुसार दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विना GST दर | GST सह दर | विना GST दर | GST सह दर |
| 1 | प्रत्येकी १२ ते १५ मिनिटांचा व्हिडीओ (व्हिडीओग्राफी व एडिटिंगच्या सहित खर्च नमूद करण्यात यावा. ) | ६० | | | | |
| | एकूण | | | | | |

सदर व्हिडिओंचे पूर्वनियोजन करण्यात आलेले आहे. TET परीक्षा मार्गदर्शन यावर एकूण ५ विषयावर आधारित अंदाजे ५५-६० व्हिडिओंची निर्मिती करणे आवश्यक आहे. सदर व्हिडिओ तयार झाल्यानंतर PMeVidya वाहिनी, दीक्षा या राष्ट्रीय ऑनलाईन प्लॅटफॉर्म तसेच परिषेदेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. खालील अ- प्रमाणे तांत्रिक तपशिलानुसार (Technical Specification) व ब - मधील अटी व शर्तींच्या आधीन राहून आपण आपल्या संस्थेमार्फत सदर व्हिडीओ निर्मितीसाठी दरपत्रक विहित नमुन्यात सादर करावेत.

**अ- तांत्रिक तपशील (Technical Specification)**

1. इयत्ता १ली ते १० वी च्या अभ्यासक्रमावर आधारित १२ ते १५ मिनिट कालावधीचे ५५-६० व्हिडिओ तयार करणे अपेक्षित आहे. आवश्यकतेनुसार व्हिडिओ संख्या व कालावधी कमी-जास्त होऊ शकते.
2. व्हिडिओ शुटींग, एडिटिंग होऊन त्याचे पुनरावलोकन केल्यानंतर त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करून देणे सेवा पुरवठादारास बंधनकारक राहील.
3. व्हिडिओ तयार केल्यानंतर ते एका पेक्षा अधिक प्लॅटफॉर्मवर/उपकरणांवर अडथळयाशिवाय किंवा सहज कार्य करतात याची खात्री करणे बंधनकारक राहील. जसे की- लॅपटॉप, टॅब्लेट, डेस्कटॉप, स्मार्टफोन, टेलिव्हीजन इत्यादी.
4. सदर दरपत्रकात ५ विषयांसाठी अंदाजे १४-१५ तासांचे व्हिडिओ शूटिंग, व्हिडीओ मिक्सिंग, फायनल एडिटिंग करून व्हिडिओ ताब्यात देणे इत्यादीसह दर नमूद केलेला असावा.
5. व्हिडीओ शुटींगपूर्वी सुलभकांसाठी आवश्यक प्रशिक्षण देणे (भाषा,पोशाख,हावभाव इत्यादीबाबत), तसेच प्रत्यक्ष चित्रीकरणाच्यावेळी मार्गदर्शन करणे सेवा पुरवठादारास बंधनकारक राहील.

6. तयार होणारे व्हिडीओ स्पष्ट (दृश्य आणि लेखन मजकुरासह) दिसणारे असावेत.
7. व्हिडीओ मधील दृश्य आणि आवाज, पाहताना आणि ऐकताना पार्श्वभूमीतील ( background ) अनावश्यक दृश्यामुळे आणि आवाजामुळे तयार करण्यात आलेला व्हिडीओच्या मूळ आशयास बाधा येणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.
8. व्हिडीओ शुटींगमध्ये आशयाच्या आवश्यकतेनुसार क्रोम स्टुडीओ सेटप, प्रत्यक्ष फळा, स्मार्ट बोर्ड, पीपीटी यांचे स्वतंत्र किंवा मिस्किंग किंवा आशयाच्या आवश्यकतेनुसार आवश्यक ठिकाणी व घटकांचा समावेश करून शुटींग व एडिटिंग करणे सेवा पुरवठादारस बंधनकारक असेल.
9. व्हिडिओची गुणवत्ता Pmevidya वाहिनी, DIKSHA सारख्या राष्ट्रीय प्लॅटफॉर्मवर upload करण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणवत्तेशी सुसंगत असली पाहिजे किंवा कार्यालयाद्वारे जे ठरविले जाईल त्या सर्व बाबींची पूर्तता करणारे गुणवत्तापूर्ण व्हिडीओ बनविणे सेवा पुरवठादारास बंधनकारक राहील.
10. Video recording format technical parameters खालील प्रमाणे आवश्यक -
    1. Video recording format- full HD 1920x1080 pixels.
    2. Studio/outdoor recording on 25 Mbps or better.
    3. Audio recording should be on AAC 2 Ch 16 bit, 48 Khz.
    ४. Video aspect ratio -16:9 (widescreen)
    ५.Video frame to maintain 6:8 % Headroom
    ६. Compressed video - 19200 following MPEG-AVC/HEVC
    ७. Audio channel to have Mixed Audio Track
    ८. Font size-Heading: 24-30, Subheading: 22-26; Body: 20-24. (as per need/suitable)
    ९. All graphs and diagrams must have clear font.

**ब - दरपत्रकातील अटी व शर्ती**

1. दरपत्रक बंद पाकीटात सादर करावे. पाकिटावर “VDO निर्मिती करिता व्हिडिओ शूटिंग दरपत्रक” असे नमूद करावे.
2. दरपत्रकामध्ये व्हिडीओचा दर अक्षरी व अंकी नमूद करावे. त्यामध्ये खाडाखोड असू नये.
3. उपरोक्त नमूद केलेले दर हे GST शिवाय व सहित तसेच प्रती व्हिडीओ दर व एकूण व्हिडीओंसाठी दर असे दोन्ही प्रकारे नमूद करावेत.
4. काम समाधानकारकपणे पूर्ण होऊन देयक सादर केल्यानंतर त्यामधून विहित शासकीय वाजवती करूनच ते अदा करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत अग्रीम (ऍडव्हान्स) दिले जाणार नाही.
5. Tax Invoice च्या मूळ रकमेवर नियमानुसार ITDS व GST शासन नियमानुसार कपात केला जाईल.
6. दरपत्रकासोबत वस्तू व सेवाकर विभागाशी नोंदणीकृत असल्याची नोंदणी क्रमांकाबाबतची प्रत जोडावी.
7. संस्थेचे PAN कार्ड दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.
8. उपरोक्त कामातील अ व ब मधील अटी व शर्ती शिथील करण्याचा तसेच कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.
9. दरपत्रक लेटरहेडवर असणे आवश्यक आहे व त्यावर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.
10. सेवा पुरवताना कार्यालयात येऊन सेवा देणे बंधनकारक राहील.
11. सेवेचा दर्जा उत्कृष्ट व कामाच्या तपशिलानुसार असावा, तसे आढळून न आल्यास कोणत्याही टप्प्यावर आपले कोणतेही देयक अदा न करता आपली सेवा घेणे रद्द केले जाईल.
12. निवड झालेल्या सेवा पुरवठादारास सेवा देताना संस्थेकडून निर्गमित केलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.
13. भविष्यात संस्थेच्या आवश्यकतेनुसार कामाच्या गुणवत्तेबाबत /लेखा आक्षेपाबाबत आवश्यक कागदपत्राची पूर्तता करणे बंधनकारक राहील.
14. संस्थेला सदर कामकाजाबाबत शासकीय वा निम शासकीय यंत्रणेसोबत काम केल्याचा अनुभव असावा.

15. सक्षम प्राधिकाऱ्याने कामाच्या पूर्णत्वाचा दाखला दिल्यावर सदर कामाचे देयक अदा केले जाईल.
16. ज्या पात्र संस्थेची, एकूण दरपत्रक (खर्चाची) रक्कम सर्वात कमी असेल त्या संस्थेची निवड करण्यात येईल व त्यानंतर सदर कामाचा कार्यादेश निर्गमित करणेत येतील. आपण केवळ दरपत्रक सादर करणे म्हणजे आपली या कामासाठी निवड झाली असे मानता येणार नाही.

उपरोक्त अटी व शर्तींच्या पूर्ततेसह आपण दिनांक २५.०६.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत दरपत्रक प्रस्तुत कार्यालयात बंद लिफाप्यात सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेण्यात येणार नाहीत.

Digitally signed by
Hemant Sharachchandra Vasekar
Date: 12-06-2026 19:10:01

डॉ.हेमंत वसेकर ( भा.प्र. से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र.